UGC CARE List Journal, Group-D, Sr.No. 31
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले
त्रैमासिक

# तिफण

## (लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विशेषांक)

**वर्ष :** दहावे
**अंक :** पहिला/दुसरा (एप्रिल ते सप्टेंबर-२०१९)

**संपादक :**
**डॉ. शिवाजी हुसे**

**अतिथी संपादक :**
**डॉ. सर्जेराव जिगे, प्रा.संजय भालेराव**

**संपादक मंडळ :**
डॉ. ताहेर पठाण, डॉ. ममता इंगोले, डॉ. फुला बागुल,
डॉ. वंदना महाजन, डॉ. वामन जाधव, डॉ. रामचंद्र झाडे,
डॉ. प्रकाश खेत्री, डॉ. अनिल गर्जे, डॉ. यशवंत सोनुने

**मूल्यमापन समिती**
डॉ. एस.एम. कानडजे (बुलडाणा), डॉ. अंबादास सगट (कन्नड)
डॉ. राजकुमार एल्लावाड (बीड), डॉ. माहेश्वरी गावित (अहमदनगर)
डॉ. प्रल्हाद वावरे (यवतमाळ)

**मांडणी :** आरती ग्राफीक्स, औरंगाबाद

**मुखपृष्ठ :** धोंडोपंत मानवतकर

**मुद्रक :** रूद्रायणी, औरंगाबाद

**वर्गणी**
वार्षिक २००/-, त्रै.वा. ५००/-, पं.वा. १०००/-

**पत्ता**
संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद - ४३११०३, मो.: ९४०४०००३९८

**स्वागत मूल्य**
१००/- रूपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही

या नियमकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिध्द झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

**या अंकात....**

- संपादकीय.....
- *अण्णा भाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वातील निराळेपण / ९*
  प्रा. शिवाजी वाठोरे
- *उपेक्षितांचा बुलंद आवाज : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे / १४*
  डॉ. सतीश मस्के
- *काळावर मात करणारा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे / १८*
  डॉ. सर्जेराव जिगे
- *साहित्य कोहिनूर : अण्णा भाऊ साठे / २९*
  डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे
- *थोर समाजसुधारक : अण्णा भाऊ साठे / ३४*
  डॉ. विठ्ठल भंडारे
- *लोकशाहीर अण्णा भाऊ साठे / ३८*
  डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे
- *अण्णा भाऊ साठे : बांधिलकी प्राणपणे जपणारा लेखक / ४५*
  प्रा. अरविंद भराडे
- *अण्णा भाऊ साठे-एक अढळ दीपस्तंभ / ५०*
  बबनराव शिंदे
- *अण्णा भाऊंचा आंबेडकरवाद / ५४*
  डॉ.सुरेश वाघमारे
- *अण्णा भाऊंनी धर्म व्यवस्था नाकारली /५८*
  डॉ.विजय कुमठेकर
- *अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मयीन कार्य /६५*
  डॉ.सरला गोरे
- *अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेले सामाजिक विचार/ ६९*
  डॉ.सदाशिव सरकटे

Scanned with CamScanner

विविध प्रश्न विचारून भंडावून सोडते. त्या प्रश्नाचे उत्तर न देता आल्यामुळे घोटाळे कसे घोटाळ्यात व चेष्टेचा विषय बनतात याचे उपहासगर्भ दर्शन या लोकनाट्यात घडते. ''अण्णांचे साहित्यविश्व हे उपेक्षित बहिष्कृतीच्या व्यथा वेदनांचे म्हणून त्यांच्या कादंबऱ्यातील जग अनोखे आहे. वास्तव जीवनाला सामोरे जाणारे जीवनदर्शन घडविणे हाच त्यांचा हेतू. जीवनसत्याला सामोरे जाणे हाच त्यांचा प्रकृतिधर्म त्यामुळे त्यांची निर्मिती आशयपूर्ण आहे. प्रचंड अनुभवधन बाळगणारा हा लेखक समाज जीवनाचा सतत वेध घेताना आपल्याला आढळतो''

दुर्लक्षित, उपेक्षित समाज त्यांनी आपल्या लेखनीतून उभा केला. त्या समाजाचे सुख दुःख, व्यथा-वेदना त्यांचा जगण्याच संघर्ष इत्यादी गोष्टीशी ते एकरूप झाले. शेतकरी, कष्टकरी, हमाल, डोंबारी, गारुडी, फासेपारधी, गिरणी कामगार, वेश्या, अस्पृश्य समाजातील माणसं त्यांच्या कादंबरीचे विषयक होते. गावकुसाबाहेरील माणसांच्या व्यथा-वेदना अण्णांनी आपल्या साहित्यातून लोकांपर्यंत पोहोचवल्या. भटके-विमुक्त, शोषित, दलीत, कष्टकरी, आदिवासी या माणसांच्या व्यथा-वेदनांचा समस्यांचा आशय अण्णांनी आपल्या साहित्यकृतीतून पोहचवला. अण्णांच्या साहित्यातील सर्व माणसं तळागाळातील असल्यामुळे भूक, वासना, अगतिकतेचे चित्रण त्यांनी केले आहे. जन्मानेच ज्या भटक्या-विमुक्तांना गुन्हेगार ठरवले होते, अशा जमातीतील लोकांना इथल्या समाजव्यवस्थेने अमानुषतेची वागणूक दिली आहे.

त्यांचा छळ केला या सर्वांचे चित्रण अण्णांच्या साहित्यात आले आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) अण्णा भाऊंचे कादंबरीविश्व - डॉ. प्रमोद गोराडे

२) अण्णा भाऊ साठे - समाजविचार आणि साहित्य - बाबूराव गुरव - विवेचन

३) फकिरा - अण्णा भाऊ साठे

४) माकडीचा माळ - अण्णा भाऊ साठे

५) वैजयंता - अण्णा भाऊ साठे

६) चित्रा - अण्णा भाऊ साठे


■■■





# ''अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेले सामाजिक विचार''

■ डॉ. सदाशिव सरकटे

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, साहित्यिक व सामाजिक जीवनात एक झंझावती, तडफदार, प्रतिभावंत मानव मुक्तीचे नायक साहित्याचा महामेरू शोषित, पीडित, उपेक्षित, वंचित असलेल्या समाजाचे झोपडपट्टीतील वास्तव चित्रण साहित्यातून मांडणारे एक झुंजार दलित लेखक महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण जगभर त्याच्या साहित्याचा गौरव केला जातो. कुठलीही ज्ञानाची शिक्षणाची परंपरा इथल्या समाजव्यवस्थेने त्यांना लाभू दिला नाही. घराण्याचा वैचारिक वारसा मिळणे शक्यच नव्हते. वारसा मिळाला पण तो कष्टाचा, दारिद्र्याचा आणि महार, मांगाची कला म्हणून जिच्याकडे पाहिल्या जाते त्या 'ढोलकी आणि तुणततुण्याचा' अन् 'तमाशाचा' त्यांना जीवनात जे भोग भोगावे लागले ते येथील विषमावादी समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या जातीवादी आणि वर्गवादी, वर्णवादी व्यवस्थेने आणि दारिद्र्याचे ते सर्व भोग अण्णांच्या वाटेला प्रकर्षाने

*आलेले होते. त्यांनी आपल्या आयुष्यात जे दारिद्र्य, अपमान पाहिला सहन केला जे भोगले, जे बकाल जीवन अनुभवले ते त्यांना एका विशिष्ट वर्णीय आणि वर्गीय जाणिवेकडे घेऊन जाणारे असेच होते.*

अण्णा भाऊ साठे यांनी प्रतिकूल परिस्थितीपुढे आयुष्यभर डगमगले नाहीत. जीवन जगताना कितीही मरण यातना, उपहास सोसावा लागला; पण लेखनाच्या धगधगत्या उर्मीनं येईल त्या प्रसंगाचा मुकाबला करण्याची ताकद दिली. यांचा प्रत्यय त्यांच्या साहित्यातून येतो. वाट्याला आलेले जीवन भोगले व तेच त्यांनी साहित्यातून मांडलेले दिसते. अण्णाभाऊंनी मार्क्सवादापासून फक्त प्रेरणा घेतली असली तरी त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू सामान्य माणूस हाच होता. अण्णा भाऊ साठे यांनी आशय, विषय, अभिव्यक्तीच्या बाबतीत स्वतंत्र मार्ग चोखाळण्याचा निष्ठेने प्रयत्न केलेला आहे.

अण्णा भाऊ साठे यांचे वाटेगाव (जन्म ऑगस्ट १९२०, मृत्यु जुलै १९६९) जि. सांगली हे जन्मगाव होय. ज्या समाजाला स्वत:चे अस्तित्वच माहीत नव्हते. ज्याला मोकळा श्वास घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते. पिढ्यान पिढ्या तो जातीय, सामाजिक, आर्थिक, अन्याय भोगणाऱ्या समाजाला शिक्षणाची दारे त्याच्यापासून मैलोन् मैल दूर होती. अशा समाजात त्यांनी जन्म घेतला होता. शिक्षण घेण्याची त्याची आर्थिक परिस्थितीही नव्हती. आयुष्यामध्ये वाटेगावात दीड-दिवस शाळा पाहिलेल्या अण्णा भाऊचे उघड्या डोळ्यांनी बघितलेल्या जीवनव्यवहारातून जगाच्या शाळेतले सारे धडे गिरवले होते. समाजजीवन हीच त्यांची शाळा होती आणि हेच त्यांचे विद्यापीठही होते.

दलित समाजाच्या मालकीची शेती किंवा उत्पन्नाची साधन नसल्यामुळे हाताला काम व पोटाला अन्न मिळाले की, तिच शेती स्वत:ची समजून कसतात. आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे गावात उपाशी मरण्यापेक्षा कोठेही जाऊन काम करून जगावे म्हणून याचे बिऱ्हाड मुंबईला निघाले. रस्त्यात लोणावळ्यामध्ये खडी फोडण्याची काम मिळाल्याने तेथे थांबले. चार अण्याच्या मोबदल्यात ही कैद्यासारखी खडी फोडण्याची ८.गू शिक्षाच होय. हे काम बेभरवशाचे असून आज आहे उद्या नाही. ठेकेदाराची मर्जी सांभाळून काम करावे लागले. येथील काम संपल्यामुळे हे बिऱ्हाड मुंबईमध्ये भायखळ्याला आले. तेथे अण्णाला कपड्याचे गठ्ठे उचलण्याचे काम मिळाले.

एका आपल्या जातीतल्या व्यक्तीने पोथी ऐकायला बोलावले. ते पाहून अण्णाला आपल्या निरक्षरतेची लाज वाटल्यामुळे शिकण्याची इच्छा अनावर



झाली. त्या व्यक्तीकडून पाटी-पेन्सिल घेऊन शिक्षणाचे धडे गिरवायला सुरुवात केली आणि त्यांनी निरक्षरतेवर मात केली. पुढे हे कुटुंब भायखळ्याहून चेंबूरला आले. घरगडी, कोळसा विकणारा, कुत्रे सांभाळणारा, खाण कामगार, सोंगाड्या, रंगारी, मजूर, तमाशातील झिलकारी अशी नानाविविध कामे केली. शेवटी ओरबाग कापड मिलमध्ये नौकरी मिळाली. कायमची नौकरी मिळाल्यामुळे उपासमारी थांबली. रेडिओ व ग्रामोफोनवरची गाणी ऐकून त्यांच्यातला सुप्त कवी-शाहीर जागा झाला. कामगार सभेत त्यांचे पोवाडे लोकप्रिय झाले. मुंबईमध्ये त्यांना शाहीर म्हणून ओळखू लागले. पुढे अण्णांची शाहिरी ही समाजप्रबोधनाचे मुख्य हत्यार बनली.

हा काळ फार धामधुमीचा काळ होता. दुसऱ्या महायुद्धामुळे जग हादरून गेले होते. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा जगभर कमी-अधिक प्रमाणात प्रभाव वाढलेला दिसतो. या तत्वज्ञानाचा प्रभाव अण्णाभाऊच्या जीवनावर झाला होता. त्याची निष्ठा बळावत होती, मानवी मनातील विधायक प्रवृत्तींना आवाहन करून परिवर्तन घडवून आणण्याकरिता त्यांनी आपली लेखनी झिजवली. हीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण होती. मराठी साहित्याची परंपरा न नाकारता ते पहिले दलित बंडखोर लेखक झाले. त्यांच्या अंगोपांगी सर्जनशीलतेचा झरा वाहत असल्यानं त्यांची अखंडपणे विपुल लेखन केलेले आहे. अण्णा भाऊ साठे यांना केवळ ४९ वर्षे आयुष्य लाभले असूनही तेरा कथासंग्रह, तीन नाटके, चौदा लोकनाटके/तमाशे, एक प्रवासवर्णन, पस्तीस कादंबऱ्या व दहा प्रसिद्ध पोवाडे इ. समृद्ध लेखन करून मराठी साहित्याच्या कक्षा विस्तृत करण्याचे कार्य केलेले आहे. सामान्य माणसाने सामान्य शब्दात लोकांकरिता लिहिलेला पोवाडा हा अप्रतिम प्रकार आहे, असे ते म्हणतात. अण्णाभाऊच्या शाहिरीने लोकांची मने विस्तारली, दलित पीडित, शोषितांनी एक व्हावे असे म्हणत असतानाच मुंबई महाराष्ट्र तसेच देशावर असलेले प्रेम जाज्वल्य प्रेम धगधगत ठेवले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये कामगार वर्गाला शाहिरीच्या माध्यमातून एकत्र करून लढा उभा केला. हे महाराष्ट्रातील जनता कधीही विसरू शकत नाही.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या घणाघाती विचारांनी संचितातल्या अनुकुलतेवर आणि वंचिताच्या एकूण प्रतिकूलतेवर प्रखरतेने आसूड ओढलेले आहेत ते म्हणतात -

''जग बदल घालुनी घाव ।



Scanned with CamScanner

*सांगून गेले मला भीमराव ।*
*गुलामगिरीच्या या लिखणात ।*
*रूतुन बसला का ऐरावता ।*
*अंग झाडुनी निघ बाहेरी ।*
*घे बिनीवरती घाव ।।''*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीमुळे आमच्या जीवनाचे सोने झाले. गुलामगिरीच्या साखळ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच तुटल्या आहेत. आता त्यांनी जग परिवर्तन केले असून मलाही जग बदलण्यासाठी त्यांनी सांगितले आहे. मी सुद्धा बाबासाहेबांनी सांगितलेल्या मार्गावरून जाणार आहे व येथील विषम व्यवस्थेच्या विरोधात लढा देणार आहे. या समाजव्यवस्थेवरच आपल्या विचारांचा घणाघाती घाव घालून ही विषमता, समाजव्यवस्था नष्ट करून येथे समता नांदावी यासाठी अण्णांनी आपले संपूर्ण आयुष्य झिजवले. त्यांना दीन-दलितांचे जग बदलायाचे हाते ही बुरसटलेली समाजव्यवस्था मुळापासून नष्ट करायची होती. शोषितांचा हा शोषकवर्ग नष्ट झाल्याशिवाय या देशात गरिबांना न्याय मिळणार नाही यावर त्यांचा दृढविश्वास होता. या देशात समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण व्हावी यासाठी ते कठोर भाषाही बोलत असे ते म्हणतात -

''लाल झेंडा घेऊन हाती । करायाला येथे क्रांती ।
मजुरांची पिढी नवी पाऊल टाकती ।।
अण्णा भाऊ साठे म्हणे । बदलून हे दुबळे जिणे ।
होणार जे विजयी ते रण करिती ।।

रणांगणात उतरून लढल्याशिवाय येथे क्रांती होणार नाही असे त्यांना वाटते. कोणताही बदल किंवा परिवर्तन घडवून आणण्यासाठी क्रांतीची आवश्यकता असते. 'फकिरा' तील कैफियतमध्ये अण्णा भाऊ साठे म्हणतात, ''जशी प्रतिभेला वास्तवाची गरज असते, तद्वतच कल्पनेलाही जीवनाचे पंख असणे आवश्यक असते आणि अनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल तर आपण का लिहितो याचा पत्ताच लागणे शक्य नाही. म्हणून मी लिहिताना सदैव सहानुभूतीने लिहिण्याचा प्रयत्न करतो. कारण ज्यांच्याविषयी मी लिहितो ती माझी माणसं असतात.''

अण्णांनी शेवटच्या माणसाच्या जगण्याची धडपड अत्यंत जवळून पाहिली. त्यांचा संघर्षही अनुभवला. या देशात केवळ आर्थिक शोषण आहे,



असे नव्हे तर सामाजिक शोषणाबरोबरच आर्थिक विषमता सुद्धा आहे. आणि याचे मूळ सामाजिक विषमतेत, धर्मांधतेत खोलवर दडलेले आहे. हे त्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांना वाटत असे की या देशातून सर्वप्रथम मनुवाद व जातिप्रथा मुळासकट नष्ट झाल्याशिवाय ही भूमी वर्गीय संघर्ष रणभूमी तयार होऊ शकणार नाही. याची त्यांना जाणीव झाली. म्हणूनच आपल्या विचाराचा पाया त्यांनी समतेसाठी मार्क्सवाद-आंबेडकरवाद असा घडवित नेला. विषमतेवर आधारित संस्कृती नष्ट व्हावी, तसेच जातीय द्वेषभावना व तिरस्काराचा बिमोड व्हावा आणि समाजात समताधिष्ठित व्यवस्था निर्माण व्हावी, असे अण्णांना वाटत असे. म्हणूनच आपल्या साहित्यातून त्यांनी जग बदल्याचे समते तत्त्वज्ञान मांडले. त्यांनी आपल्या साहित्यातून समभाव, सामाजिक ऐक्य या मूल्यांची जाणीव केली. जातीपेक्षा माणूस महत्त्वाचा आहे म्हणून त्यांनी 'माणसा' या कार्यकर्तृत्त्वावर, चारित्र्यावर लिहिले. त्यांनी मानवतेची पूजा केली म्हणूनच ते 'बरबाद्या कंजारी' या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत लिहितात ''माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसे फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, जगाला जगवतात त्याच्या बळावरच हे जग चालते. त्यांची झुंज आणि यश यावर माझा विश्वास आहे'' यातून श्रम करणाऱ्या माणसाविषयी असलेला आदर, त्यांच्याबद्दलचा असलेला विश्वास अण्णां जवळ होता. हे प्रकर्षाने जाणवते. त्यांनी आपल्या साहित्यात विशिष्ट एका जातीच्याच लोकांना स्थान दिलेले नसून सर्व जाती धर्मातील सर्व स्तरातील स्त्री-पुरुषांना प्रतिनिधित्व दिले आहे. एवढेच नव्हे तर अन्यायाविरुद्ध बंड करून उठणाऱ्या, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून दुष्ट प्रवृत्तीशी लढणाऱ्या विद्रोही बंडखोर नायिका आपल्या साहित्यातून उभ्या केल्या, उपेक्षित दीन-दलित माणसाच्या जगण्याशी प्रामाणिक राहून साहित्य लेखन केले म्हणूनच ते उपेक्षितांचे कैवारी होते. म्हणूनच त्यांनी आपल्या साहित्यातून उपेक्षितांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

अण्णा भाऊ साठे यांच्या कथांनमधून निसर्गवर्णने, ठसठसीत नायक-नायिका, त्यांच्या जीवनातील रोकठोक नाट्यप्रसंग, निवेदन शैली, सुभाषितात्मक वचने, रुचिर निसर्गवर्णने आणि सुबोध जीवनार्थ यांचे मोह वाचकांना सहजपणे पडल्याशिवाय राहत नाही. वारणेच्या खोऱ्यातील, माकडीच्या माळावरील, खुळेवाडीच्या परिसरातील त्यांची माणसे व त्यांच्या जीवनकथाचे वर्णन मराठी साहित्याला नवीन होते. या नाविण्याचा अनुभव त्यांनी मराठी वाचकांना दिलेला आहे. त्यामुळे अण्णा भाऊ साठे यांच्या कथा व



Scanned with CamScanner

कादंबरी वाङ्मयाचे सर्वसामान्यांच्या मनात आदराचे व आकर्षणाचे स्थान आहे.

एकूणच अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यलेखनाचा विचार करता दलित-उपेक्षित, जीवनाला एक उमेदपणा दिला. वाटेगावच्या, शिगावच्या, माकडीच्या माळावरच्या, मालवाडीच्या, खुळवाडीच्या, कुमजेच्य त्या परिसरातील समाजजीवनात जे घडून गेले होते ते दलित जगणे, एका स्वाभिमानाने, प्रतिष्ठेने, ताठ मानेने व्यथित झालेले होते. शौर्य, त्याग, प्रतिष्ठा, साहस, बलिदान, माणुसकी अशी नैतिक मूल्ये देऊन नायकास दलित जीवनाला श्रीमंत करण्याचे ऐतिहासिक काम अण्णांनी केलेले दिसते. मराठी साहित्याला अनभिन समाजजीवन दाखवून दिलेले आहे. ग्रामीण जीवनाचे आणि दारिद्र्याने पिचलेल्या मुंबईच्या गलिच्छ वस्त्यांमधून राहणाऱ्या व्यक्तींचे बोलके आणि जिवंत चित्र अण्णांनी रेखाटले आहे याला तोड नाही.

महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या सीमाभागातील भाषिकावर कानडी भाषेच्या प्रभावामुळे अण्णा, आक्का, आप्पा या शब्दाचा वापर सर्रास केला जातो. अण्णा म्हणजे मोठा भाऊ, वडील भावाला अण्णा म्हणण्याची पद्धत आहे. अण्णांनी मराठीत पहिल्यांदा विस्तृतपणे दलित/समाजजीवन रेखाटलेले आहे. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण ते दलित-उपेक्षित पिडित समाजाचे पहिले लेखक व भाष्यकार होते. या निराळ्या मराठी साहित्यात न आलेल्या जगाचे दर्शन पहिल्यांदाच अण्णांनी घडवलेले आहे. वारणेच्या खोऱ्यातील समाजजीवन बोलके केलेले दिसते. रा.ग. जाधव म्हणतात, "मराठी समाजाला त्या दलित विश्वाची वाङ्मयीन प्रतिभा कोणीही सादर केली नव्हती. अण्णांना म्हणूनच त्या जगाच्या इतिहासचित्राची उभारणी करून अपूर्वतेच्या उल्हासाने त्यांनी आपले बालपणीचे स्मृतिकोश साहित्यातून उधळून दिले." एकूणच अण्णा भाऊ हे एका विशिष्ट जातीचे जमातीचे व समाजाचे नव्हते तर ते जगातील कष्टकऱ्यांचे पीडितांचे, शोषितांचे प्रतिनिधी होते.

संदर्भ सूची : -

१) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य वेदना विद्रोह'
२) अण्णा भाऊ साठे, 'फकिरा'
३) अण्णा भाऊ साठे, 'बरबाद्या कंजारी'
४) अण्णा भाऊ साठे, 'चिखलातील कमळ'
५) प्रा. रा.ग. जाधव, 'निळी पहाट'

■■■





# लोकनाट्याचे जनक-लोकशाहीर अण्णा भाऊ साठे

■ डॉ. प्रवीण बनसोड

१

१९४२ साली बंगाल प्रांतात भीषण दुष्काळ पडला. लाखो भूकबळी पडू लागले. सर्वत्र हाहा:कार उडाला. तेव्हा दुष्काळग्रस्तांसाठी मदतनिधी गोळा करण्यासाठी मुंबईतील लोक कलावंतांनी 'इष्टा' (इंडीयन पिपल्स थिएटर ॲकॅडमी) या संस्थेची स्थापना केली आणि दुष्काळग्रस्तांसाठी कार्यक्रमांची मालिका सादर करण्याची योजना तयार केली. या कार्यक्रमात बंगालच्या दुष्काळग्रस्तांवर एक पोवाडा स्वत: रचून सादर करण्याचे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी ठरविले. 'बंगालची हाक' या त्यांच्या पहिल्या पोवाड्यापासून पुढे १४-१५ पोवाडे अण्णा भाऊंनी लिहिले. अन्यायाच्या विरोधात संघर्ष करण्याची प्रेरणा देणारे पोवाडे अण्णाभाऊंनी लिहिले. त्यामुळे 'लोकशाहीर' या सार्थ उपाधीने त्यांना गौरविले जाते.



Scanned with CamScanner